Exh.9

दि. किरकोळ अर्ज नं. ०५/२०२६

## मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर, राधानगरी

Order-
Deponent is present before the court. On oath he has affirmed the contents as true and correct. Hence, read and recorded.
Sd/-
Jt. C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 02/07/2026

**यांचे कोर्टात...**

१. श्री. भानुदास शामराव सुतार वगैरे ......... अर्जदार

विरूध्द

कोणीही नाही ............ वि. प.

**सी. पी. सी. ऑ. १८ रूल ४ प्रमाणे अर्जदार नं. १ यांचे सरतपासाचे ॲफिडेव्हीट**

**ॲफिडेव्हीट**

मी यातील अर्जदार नं. १. श्री. भानुदास शामराव सुतार व. व. ५५, धंदाः आरा गिरणी चालवणे, रा. नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर देवाची शपथ घेवून ॲफिडेव्हीट करतो की,

१. मी सदरचा जबाब माझेकरीता व अर्जदार नं. २ ते ५ यांचेकरीता देत आहे.

२. माझे व अर्जदार क्र. ३ ते ५ यांचे वडील व अर्जदार क्र. २ चे पती शामराव रावू सुतार हे आहेत. ते माझेसोबत व अर्जदार नं. २ यांचे सोबत नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे राहत होते. ते दि. २३.०८.२०२५ इ. रोजी मयत झाले. सध्या मी व अर्जदार नं. २ हे नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे राहत असून आमचा लाकुड खरेदी विक्री करणे व उभ्या व आडव्या आरा गिरणी व्दारे लाकूड कापणी करणे अशा प्रकारच्या व्यवसाय केदारनाथ सॉमिल या नावाने चालू केला होता. माझे व अर्जदार क्र. ३ ते ५ यांचे वडील शामराव रावू सुतार यांचे नावे आरा गिरणी यंत्र परवाना क्र. आर २१५/१४ असून ते दिनांक

Assistant Superintendent

२३.०८.२०२५ इ. रोजी मयत झाले. अर्जदार नं. ३ ते ५ हया त्यांच्या मुली असून त्या विवाहित आहेत. त्या आपल्या सासरी राहतात.

३. मयत शामराव रावू सुतार यांना आम्ही अर्जदार नं. १ ते ५ हेच वारस आहोत अन्य कोणीही वारस नाहीत.

४. माझे व अर्जदार क्र. २ यांचे नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर येथे एकत्र कुंटूब असून आरा गिरणी परवाना हा श्री. शामराव रावू सुतार यांचे नावे होता. त्याची मुदत दि. ३१.१२.२०२५ पर्यत आहे ते मयत असलेने नवीन आरा गिरणी परवाना घेणे आवश्यक आहे. त्याखेरीज सॉमिल चालवणे अडचणीचे होणार आहे म्हणून मी सॉमीलचा आरा मशिन परवाना क्र. आर २१५/१४ हा माझे नावे करणेसाठी उपवनसंरक्षक वनविभाग कोल्हापूर यांचेकडे अर्ज केला असता त्यांनी मला दिवाणी कोर्टातून वारसाचा दाखला आणणेस सांगितलेने मला सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल करणे भाग पडत आहे.

५. मी नि. ३ सोबत अ. नं. १ ला शामराव रावू सुतार यांचे नावे असलेला आरा गिरणी परवाना क्र. R-215/14 ची स. शि. प्रत हजर केलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी देणेत यावी. तसेच मी नि. ३ सोबत अ. नं. २ ला शामराव रावू सुतार यांचा कोल्हापूर महानगर पालिका यांचेकडील मृत्यूचा दाखल्याची अस्सल प्रत हजर केलेली असून त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास निशाणी देणेत यावी.

६. मी याकामी सदर अर्जाचा जाहीरनामा दैनिक जनप्रवासला दि. १०.०४.२०२६ इ. रोजीचा हजर केलेची अस्सल प्रत हजर केली आहे.

<u>७.सबब विनंती की,</u>

अ) माझा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) आम्ही अर्जदार नं. १ ते ५ हेच मयत शामराव रावू सुतार यांचे एकमेव वारस आहोत असा वारसांचा दाखला आम्हा अर्जदार यांना मिळावा.

Assistant Superintendent

क) आम्ही अर्जदार नं. १ ते ५ करीता माझे नावे सदरचा दाखला केदारनाथ सॉमिल चे परवाना क्र. आर–२१५/१४ यासाठी मिळावा त्यास अर्जदार नं. २ ते ५ यांची मान्यता आहे.

क) इतर अनुषंगिक हुकूम याच कामी माझे बाजूने व्हावेत.

म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी ता. ३०.०६.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

(ॲड. जी. के. वागरे)

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार नं. १. श्री. भानुदास शामराव सुतार व. व. ५५, धंदाः आरा गिरणी चालवणे, रा. नरतवडे, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

ता. ३०.०६.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. भानुदास शामराव सुतार
Age 55 Occu. व्यवसाय
of नरतवडे, ता. राधानगरी
Who identified by Shri./Smt. जी. के. वागरे वकील
Adv. Whom I Know personally
Dated 30.6.2026
Assistant Superintendent